आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२२ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य विधानसभा निवडणुकांची उद्या मतमोजणी / निवडणूक आयोगाचं व्यापक नियोजन

- जागतिक सहकार संघटनेच्या आंतराष्ट्रीय संमेलनाचं येत्या सोमवारी नवी दिल्लीत होणार उद्घाटन

- मराठी नाट्य कलाकार संघातर्फे दिला जाणारा 'रंगकर्मी जीवनगौरव पुरस्कार' यंदा ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांना जाहीर

**आणि**

- बॉर्डर-गावसकर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचा पहिला डाव १५० धावांवर समाप्त, ऑस्ट्रेलियाचीही खराब सुरुवात

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या सकाळी ८ वाजल्यापासून सुरू होणार आहे. मतमोजणीची सुरुवात टपाली मतांच्या मोजणीपासून होईल आणि त्यानंतर साधारण साडेआठ वाजल्यापासून मतदान यंत्रावरच्या मतांची मोजणी सुरू होईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिली आहे. २८८ विधानसभा मतदारसंघांमधल्या मतमोजणीसाठी तितकीच मोजणी केंद्रं काम करणार आहेत, शिवाय नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी एक मोजणी केंद्र स्थापन करण्यात आलं आहे. या प्रक्रियेसाठी सुमारे ६ हजार ६०० पथकं नियुक्त करण्यात आली आहेत. मतमोजणी केंद्रांवर केंद्रीय पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल आणि स्थानिक पोलिसांच्या कड्यांची त्रिस्तरीय सुरक्षाव्यवस्था तैनात

करण्यात आली आहे. मतमोजणीच्या प्रक्रियेवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची करडी नजर असणार आहे. दुपारी बाराच्या सुमाराला पहिले निकाल हातात येतील, मात्र मतदारसंघाच्या आकारमानानुसार यात फरक पडू शकतो. संध्याकाळी निकालाचं पूर्ण चित्र स्पष्ट होईल, असंही एस. चोक्कलिंगम यांनी नमूद केलं आहे.

विधानसभा निवडणुकीच्या निकालांच्या ताज्या बातम्या देणारी निवडणूक विशेष बातमीपत्र उद्या सकाळी ९ वाजल्यापासून प्रसारित होणार आहेत. तसंच निवडणूक निकालांचं तज्ज्ञांनी केलेलं विश्लेषण ‘निवाडा जनतेचा’ या कार्यक्रमात आपल्याला ऐकायला मिळेल.

**<><><><><>**

मतदान यंत्र ठेवलेल्या स्ट्राँगरूमला त्रिस्तरीय सुरक्षाकवच देण्यात आलं असून, शंभर मीटर परिसरात कोणालाही प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे ईव्हीएम अथवा स्ट्राँग रूमबाबत कोणत्याही प्रकारच्या अफवेवर विश्वास ठेवू नये, असं निवडणूक निर्णय अधिकारी आकाश लिगाडे यांनी सांगितलं. चिपळूणमध्ये मतदानयंत्रात छेडछाड करण्याच्या हेतूने काही जण थांबले असल्याची तक्रार एका पक्षकार्यकर्त्याने दाखल केली होती त्या संदर्भात लिगाडे यांनी खुलासा केला.

**नवी मुंबई**तल्या ऐरोली विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत असलेले स्वराज्य पक्षाचे उमेदवार अंकुश कदम यांच्यावर काल कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. भाजपचे माजी नगरसेवक शंकर मोरे यांचा मुलगा जयेश मोरे याला मारहाण केल्याची तक्रार मोरे यांनी केली होती, त्यावरून कदम यांच्याविरुद्ध आचारसंहिता भंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

**धुळे** शहरात मतदान यंत्र घेऊन जाणारे वाहन अडवून निवडणूक अधिकाऱ्याला धमकी देणाऱ्या तरुणासह ५० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धुळ्यातल्या अभय कॉलेजजवळ काल ही घटना घडली होती.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या ८१ जागांसाठी तसंच आसाम, बिहार, छत्तीसगढ, गुजरात, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, मेघालय, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पश्चिम बंगाल या राज्यांतल्या विधानसभा आणि केरळच्या वायनाड लोकसभा पोटनिवडणुकीची मतमोजणीदेखील उद्याच होणार आहे. झारखंडमध्ये २४ मतमोजणी केंद्रं उभारली असून उद्या सकाळी टपाली मतांच्या मोजणीला सुरुवात होईल, असं झारखंडचे मुख्य निवडणूक अधिकारी के रवी कुमार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते येत्या २५ नोव्हेंबर रोजी जागतिक सहकार संघटनेच्या आंतराष्ट्रीय संमेलनाचं नवी दिल्ली इथे उद्घाटन होणार आहे. यावेळी आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त एका टपाल तिकीटाचं प्रकाशनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होईल. सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. आशिष कुमार भुतानी आणि इफ्को लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. यू. एस. अवस्थी यांनी वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. गेल्या १३० वर्षांत प्रथमच आयसीए अर्थात आंतरराष्ट्रीय सहकार आघाडीच्या बैठकीचं तसंच या संमेलनाचं आयोजन भारतात होत आहे. २५ नोव्हेंबर रोजी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा हे या संमेलनाचं उद्घाटन करणार आहेत.

या संमेलनात भारताच्या प्रतिनिधी म्हणून डॉ. वर्षा कस्तुरकर या सहभागी होणार असून महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राला या संमेलनाचा मोठा लाभ होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**होल्ड बाईट- वर्षा कस्तुरकर**

**<><><><><>**

तीन देशांचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मायदेशी परत यायला निघाले आहेत. गेल्या दशकभरात झालेला भारताचा प्रवास हा प्रमाण, गती आणि शाश्वततेचा असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी काल गयानामध्ये भारतीय समुदायाला संबोधित करताना केलं. गयानात जॉर्जटाऊन इथल्या नॅशनल कल्चरल सेंटरमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. भारत लवकरच जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होणार असल्याचा पुनरुच्चार केला. भारतीय तरुणांनी देशाला जगातली तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था हा लौकिक प्राप्त करून दिला आहे. भारताचा विकास केवळ प्रेरणादायीच नव्हे तर समावेशक देखील आहे, असंही मोदी म्हणाले. तत्पूर्वी त्यांनी काल गयानाच्या संसदेच्या विशेष अधिवेशनालाही संबोधित केलं. समावेशक समाजाच्या उभारणीसाठी लोकशाहीपेक्षा अन्य कोणतंही मोठं साधन नाही. पुढे जायचं असेल तर लोकशाही प्रथम आणि मानवता प्रथम हाच मंत्र आहे, लोकशाही भारतीयांच्या डीएनएमध्येच आहे, असं मोदी यावेळी म्हणाले. प्रधानमंत्री मोदींनी काल जॉर्जटाऊन इथं गयानाचे अध्यक्ष इरफान अली यांच्यासमवेत वेस्ट इडिजच्या नामवंत क्रिकेटपटूंचीही भेट घेतली. नायजेरिया, ब्राझील आणि गयाना या तीन देशांचा यशस्वी दौरा आटोपून प्रधानमंत्री मायदेशी परत यायला निघाले आहेत.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज लाओसमध्ये व्हिएन्तियान इथे जपानचे संरक्षण मंत्री जनरल निकातानी यांची भेट घेतली. निकातानी यांच्यासोबत या भेटीदरम्यान दोन्ही देशांमध्ये इंडो-पॅसिफिक प्रदेशातल्या मुक्त भागिदारीविषयी चर्चा झाल्याचं सिंह यांनी आपल्या समाज माध्यमावर म्हटलं आहे. त्यानंतर सिंग यांनी फिलिपीनचे संरक्षण सचिव गिल्बर्टो टिओडोरो यांचीही भेट घेतली. ॲक्ट ईस्ट धोरण आणि इंडो पॅसिफिक व्हिजन या योजनांमधला फिलीपीन हा महत्त्वाचा

भागीदार आहे. त्यामुळे फिलीपीनसोबत संरक्षण सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन राजनाथ सिंह यांनी केलं.

<><><><><>

मराठी नाट्य कलाकार संघातर्फे दिला जाणारा ‘रंगकर्मी जीवनगौरव पुरस्कार’ यंदा ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांना जाहिर झाला आहे. मराठी नाट्य कलाकार संघाचे प्रमुख कार्यवाह विजय सूर्यवंशी यांनी काल मुंबईत ही माहिती दिली. येत्या २५ तारखेला, मुंबईत आयोजित ‘जागतिक रंगकर्मी दिन’ सोहळ्यात हा पुरस्कार जोशी यांना प्रदान करण्यात येणार आहे.

<><><><><>

२०२२ आणि २०२३ या वर्षांसाठीचे उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार आज नवी दिल्लीत सांस्कृतिक खात्याचे सचिव  अरुणिश चावला यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. पुरस्कार मिळालेल्यांत अनुजा झोकरकर, सारंग कुलकर्णी आणि नागेश अडगावकर यांचा समावेश आहे. संगीत, नृत्य, नाट्य, लोककला, आदिवासी कला आणि कठपुतळी नृत्य क्षेत्रातील ८२ युवा कलाकारांना २५ हजार रोख रुपये आणि मानपत्र देऊन सन्मानित केलं. २००६ मध्ये संगीत नाटक अकादमीनं युवा कलाकारांसाठी हे पुरस्कार सुरू केले.

<><><><><>

मंगळूर विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या राज तिवारी या खेळाडूनं उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण पदक पटकावलं. तिवारीनं ३० मिनिटं ५९ सेकंद वेळ देत वैयक्तिक सुवर्णपदक मिळवलं. मुंबई विद्यापीठानं  क्रॉसकंट्री स्पर्धेत पहिल्यांदाच वैयक्तित गटात सुवर्ण पदक तर पुरुष संघाचं उपविजेतेपद पटकवलं आहे. मुंबई विद्यापीठाचे

कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या संघाचं अभिनंदन केलं.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघात बॉर्डर-गावस्कर करंडकासाठी पर्थ इथं पहिला कसोटी सामना सुरू आहे. भारतीय संघाची सुरुवात निराशाजनक झाली त्यांचा पहिला डाव सर्व गडी बाद १५० धावांवर आटोपला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या यजमान ऑस्ट्रेलियन संघाचीही सुरुवात अडखळत झाली. आत्ताच हाती आलेल्या बातमीनुसार ऑस्ट्रेलियाच्या सहा गडी बाद ४९ धावा झाल्या आहेत. कर्णधार जसप्रित बुमराहनं तीन, मोहम्मद सिराज यानं दोन, हर्षित राणा यानं एक गडी बाद केला.

**//<><><><><>//**